UGC Approved Jr.No.43053

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

## Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

May 2018, Issue-41, Vol-02

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**Co-Editor**
**Dr. Ravindranath Kewat**
(M.A. Ph.D.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

25) संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील राष्ट्रवीरकार शामराव देसाई यांचे योगदान
प्रा.विशाल रामदास रोकडे, ता.पारनेर, जि.अहमदनगर || 118

26) कोल्हापूर संस्थानातील शाहू महाराजांची शेती आणि सिंचन व्यवस्थेचे अध्ययन
प्रा.डॉ. एन.बी. पोहकर, ता. औंढा नागनाथ, जि. हिंगोली || 121

27) महावीर जोंधळे यांच्या 'जनगोत' या व्यक्तिचित्राचा अभ्यास
डॉ. जगन्नाथ चौधरी—श्री. निलेश प्रभाकर शेळके || 124

28) वस्तू व सेवा कर:एक संक्षिप्त आढावा
डॉ. वाल्मिक दगडू परहर, ता. मंडणगड,जि. रत्नागिरी || 130

29) महाविद्यालयीन ग्रंथपालाचे कार्यसमाधान—एक अभ्यास
प्रा. रेवाराम एम. मालखेडे, ता.नरखेड, जि.नागपूर || 133

30) नाशिक जिल्ह्यातील जैन लेणी
डॉ.व्ही.एस.देसले-प्रा. जाधव नितीन साहेबराव || 138

31) राष्ट्रीय जागरण एवं उत्तरप्रदेश की पत्र—पत्रिकायें—एक ऐतिहासिक विवेचन
डा० अश्विनी कुमार, भुता, बरेली || 145

32) नगरीकरण का इतिहास
मुकेश चन्द्र—डा० रश्मि पंत, पिथौरागढ़ (उत्तराखण्ड) || 150

33) प्रगतिशील साहित्य और केदारनाथ अग्रवाल
संतोष नागरे, गेवराई जि.बीड || 156

34) भारतीय दर्शन और मानव संसाधन प्रबन्ध
डा.आर.एस. बांगड़, भीलवाड़ा (राजस्थान) || 159

35) गुरुदेव रवीन्द्रनाथ टैगोर का शैक्षिक चिन्तन
कपिल भारद्वाज—डॉ. रीतु बाला, श्रीगंगानगर (राज.) || 161

36) देवेश ठाकुर के कथा साहित्य में व्यंग्य
छत्रपति पंत, अल्मोड़ा। || 166

www.vidyawarta.com/03 _ http://www.printingarea.blogspot.com

गटांची स्थापना करुन एक एक महिला एकत्र करुन तेव्हा एक गट बनविते व त्यांना विविध प्रशिक्षण देऊन त्यांचा आर्थिक, सामाजिक, राजकीय विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या सहयोगिनीला जेव्हा त्यांनी तयार केलेल्या महिला जेव्हा त्याच्या मालकीनी बनतात तेव्हा त्यांच्या कार्याचे मूल्यांकन करणाऱ्या त्या महिलाच असते व त्यांचे वेतन सुध्दा काढणाऱ्या महिलाच असते पण ज्या महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी जी सहयोगिनी दिवसरात्र झटते त्या सहयोगीनीला तेथील कार्यकारिणी निवडण्याचा हक्क सुध्दा नाही हे कितपत योग्य आहे. कारण त्या निमंत्रित सदस्य आहे. ज्यामुळे सहयोगीनींना सदैव आपली नोकरी टिकविण्याकरिता मानसिक दबावाखाली काम करावे लागते मग ती खरचं चांगले काम करेल काय?

सरकारी-सहकारी-सार्वजनिक क्षेत्रातील नोकरीत आठ तासांचा दिवस, आठवड्याची पगारी सुटी, हक्काची रजा, भविष्य निर्वाह निधी, निवृत्ती वेतन इ. सुविधांचे संरक्षण कायद्याने प्राप्त होते.

माणूस काम का करतो? हा मानवी जीवनातील मूलभूत प्रश्न आहे. माणूस पोटासाठी काम करतो हे या प्रश्नाचे जुने उत्तर आहे. दुसऱ्या शब्दात स्वतःच्या गरजांची पूर्ती करण्यासाठी माणूस काम करतो. हे या प्रश्नाचे सार्वत्रिक उत्तर असू शकते. परंतु या उत्तराने प्रश्न सुटत नाही तर तो अधिक गुंतागुंतीचा होतो. मानवी जीवनात एकूण गरजा आहेत तरी किती? कोणत्या गरजांच्या पुर्तीद्वारे समाधान मिळते? या व अशी अनेक प्रश्नांची उत्तरे मिळत नाही.

**संदर्भग्रंथ सूची:-**


- माविम, जनतेचे धन जनतेला अर्पण, लोकसंचालित साधन केंद्र संकल्पना पुस्तिका
- माविम, माविम सहयोगीनी (कार्यकर्ती) मार्गदर्शक पुस्तिका
- माविम सहयोगीनी स्वयंसहाय बचत गट चळवळीचा कणा
- माविम सांगाती महिला आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय वर्धा
- माविम भरारी बचत गटांच्या यशस्वी यशोगाथा, महिला आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय वर्धा
- MAVIM, Information brochure of Tejaswini Programme
- MAVIM, "MAVIM Sahyogini" Guidance handbook for field Worker
- MAVIM, SHG Training Manual (English/Marathi)
- MAVIM, MAVIM,'s endeavor to strengthen (Self Help Group) in Maharashtra
- MAVIM, Yashasvi Paulkhuna


❑❑❑

**25**

# संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील राष्ट्र वीरकार शामराव देसाई यांचे योगदान


**प्रा.विशाल रामदास रोकडे**
इतिहास विभागप्रमुख,
श्री मुलिकादेवी महाविद्यालय,
निघोज, ता.पारनेर, जि.अहमदनगर


***********

**प्रास्ताविक:**

भारतास स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच अखंड महाराष्ट्र राज्य निर्माण व्हावे व स्वतंत्र भारतात संयुक्त महाराष्ट्राच्या रूपाने स्वतंत्र घटकराज्य अस्तित्वात यावे याकरिता प्रयत्न सुरू असलेले दिसून येतात. इ.स.१९१७ मध्ये विठ्ठल वामन ताम्हणकर यांनी ज.वि.ओक यांनी संपादित केलेल्या लोकशिक्षण या मासिकाच्या अंकात विभंगलेला महाराष्ट्र हा लेख प्रकाशित केला. यात मुंबई प्रांत, मध्य प्रांत, वऱ्हाड आणि हैद्रावाद संस्थानातील मराठवाडा या भागातील मराठी भाषिक प्रदेश एकत्र आणून एकसंघ महाराष्ट्राची निर्मिती करावी असे म्हटले होते. पुढे इ.स.१९३७ मध्ये द.वा.पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली भरलेले साहित्य संमेलन तसेच इ.स.१९४० मध्ये गं.त्र्यं.माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली उज्जैन येथे भरलेले मराठी वाङ्मय मंडळ संमेलन इ. अनेक सभा संमेलनांद्वारे संयुक्त महाराष्ट्रांची मागणी पुढे येऊ लागली. याचकाळात संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा पाया इ.स.१९३८ मध्ये वऱ्हाड प्रांतात घातला गेला.१ यावेळी छ. ८. भ्रार प्रांताच्या विधिमंडळाचे सदस्य श्री.रामराव देशमुख यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीस गती देण्याचे काम केले. १२ मे १९४६ रोजी बेळगाव येथिल मराठी साहित्य संमेलनात गं.त्र्यं.माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा संयुक्त महाराष्ट्र चळवळीस वेग चढला. त्यातूनच पुढे शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्र परिषद २८ जुलै १९४६ रोजी स्थापन झाली.२

संयुक्त महाराष्ट्र चळवळीस मराठी भाषिक प्रांतातून

मोठया प्रमाणावर पाठींवा मिळत होता परंतू स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुरूवातीच्या कॉंग्रेसजन पुढा-यांनी मात्र या संयुक्त महाराष्ट्र चळवळीस विरोध दर्शविलेला दिसून येतो. त्यातूनच दार कमिशन (१९४७), अकोला करार (१९४७), जे.व्ही.पी. समिती (१९४९), नागपूर करार (१९५३), राज्य पुनर्रचना आयोग फाजलअली कमिशन (१९५३), आंध्र प्रदेशास मान्यता (१९५३), त्रिराज्य योजना (१९५५) इ.शासकीय प्रक्रियेनंतर ६ फेब्रुवारी १९५६ रोजी एस.एम.जोशी व केशवराव जेधे यांच्या प्रयत्नाने महाराष्ट्रातील सर्व विरोधी पक्षांची युती होऊन "संयुक्त महाराष्ट्र समितीची" स्थापना झाली. याचकाळात १ नोव्हेंबर १९५६ रोजी द्वैभाषिक राज्य अस्तित्त्वात आले परंतू या द्वैभाषिक राज्यास गुजराती व मराठी भाषिक असंख्य जनतेने तीव्र विरोध दर्शविला. पुढे इंदिरा गांधी यांनी महाराष्ट्राचा दौरा करून संयुक्त महाराष्ट्रास पाठींबा दर्शविला. महाराष्ट्रीयांच्या या चळवळीस १ मे १९६० रोजी यश मिळाले व त्यातूनच संयुक्त महाराष्ट्र राज्य उदयाला आलेले दिसून येते. संयुक्त महाराष्ट्र निर्माण होण्याकरिता ज्याप्रमाणे प.महाराष्ट्र, व-हाड, मराठवाडा, विदर्भातील जनतेने तीव्र लढा उभारला त्याचप्रमाणे बेळगाव-कारवार यांसारख्या सीमावर्ती मराठी भाषिक बहुल प्रदेशातूनही या चळवळीस मोठया प्रमाणावर पाठींबा देण्यात आलेला दिसून येतो. बेळगाव सीमावर्ती भागातून छ.राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रेरणेने राष्ट्रवीरकार शामराव देसाई यांनीही संयुक्त महाराष्ट्र चळवळीत बहुमोल असे योगदान दिलेले दिसून येते. राष्ट्रवीरकारांच्या याच संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदानाचा अल्पसः आढावा याठिकाणी घेण्यात आला आहे.

**राष्ट्रवीरकार शामराव देसाईचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान :**

शामराव देसाई यांनी बेळगावात करवीर निवासी छ.राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रेरणेने "राष्ट्रवीर" साप्ताहिकाच्या माध्यमातून आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत व प्रबोधन कार्यास गती दिलेली दिसून येते. शामराव देसाईनी इ.स.१९२९ ते १९५९ याकाळात राष्ट्रवीर साप्ताहिकाच्या माध्यमातून तत्कालीन सामाजिक, राजकिय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतीक अशा विविध पैलूंवर भाष्यरूप परखड लिखान केलेले दिसून येते. याकाळात त्यांनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर अशा दोन्ही कालखंडात ब्रिटीश तसेच भारतीय पुढा-यांच्या भूमिकांबद्दल परखडपणे आपली मते मांडलेली दिसून येतात.

शामरावांचा पिंडच मुळी समाजकारणी असल्याने त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीकडे अतिशय दुरदृष्टिने पाहिले व संयुक्त महाराष्ट्र चळवळीत अतिशय हिरिरिने सहभाग घेतला. बेळगाव-कारवार हा मराठी भाषिक प्रदेश अन्यायपूर्वक म्हैसूर राज्यात घालण्यात आला होता. यावेळी महाराष्ट्र एकीकरण समिती व नंतर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत राष्ट्रवीरकारांनी सहभाग घेतला. याकाळात शामराव देसाईनी "राष्ट्रवीर" साप्ताहिकातून तर बाबुराव ठाकुरांनी "तरूण-भारत" मधून सीमाप्रश्न तसेच संयुक्त महाराष्ट्र आंदोलन दक्षिण महाराष्ट्रात धगधगीत ठेवले. यावेळी त्यांनी ब्राम्हण-ब्राम्हणेत्तर हा वाद बाजूला ठेऊन सर्व जाती-जमातींमधील मराठी माणसे एका छत्राखाली एकवटवली. "संयुक्त महाराष्ट्र चळवळ" व "महाराष्ट्र एकीकरण समिती" या दोन आंदोलनांची यथायोग्य सांगड घालून धोरणात्मक आराखडा करण्यात राष्ट्रवीरकार आघाडीवर होते. या आंदोलनातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व सीमाभागातील नेते कॉ.कृष्णा मेणसे यांची याबद्दलची साक्ष महत्त्वपूर्ण आहे. ते म्हणतात, "सामाजिक सुधारणा करणे हे जरी त्यांच्या जिवनाचे कार्य असले तरी तद्नुषंगाने होणा-या राजकिय आंदोलनाकडे त्यांनी कधीही पाठ फिरवली नाही. बेळगाव, कारवार, बीदर जिल्हयातील मराठी भाग सक्तीने म्हैसूर राज्यात कोंवण्यात आला त्यामुळे या भागात आंदोलनांचा प्रचंड डोंब उसळला. महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेतृत्त्वाखाली जनतेने लढे उभारले. त्याचप्रमाणे सबंध मराठी भाषिक जनतेवर द्विभाषिक राज्य लादून तिचा मानभंग करण्यात आला. यामुळे मुंबई राजधानी असलेला संयुक्त महाराष्ट्र निर्माण झालाच पाहिजे, या निर्धाराने मराठी जनतेने राज्यकर्त्यांशी शौर्यशाली लढा दिला. या दोन्ही लढयांची सांगड घालून संयुक्त महाराष्ट्र समिती आणि महाराष्ट्र एकीकरण समिती यांच्यामध्ये अद्वैत्य निर्माण करण्याच्या कामामध्ये गुरूवर्य शामराव देसाई यांनी मोठा भाग घेतला होता. हजारोंच्या संख्येने मराठी भाषिक सत्याग्रहाच्या रणांगणात उतरले. यामुळे लढयाची व्यापकता वाढली, तीव्रता वाढली आणि अखेरीस मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाल्याचे जे आपण पाहतो ते सर्व मराठी भाषिक जनतेच्या न्याय्य लढयाला आलेले यश होय.

सीमाप्रश्न व संयुक्त महाराष्ट्र आंदोलन याविषयी अनेक अग्रलेख व स्फुटलेख "राष्ट्रवीर" मधून शामरावांनी

प्रकाशित केले. एखाद्या इतिहासकारास सीमाप्रश्नाचा इतिहास लिहावयाचा झाल्यास त्यात राष्ट्रवीरकारांच्या लिखानाची दखल घ्यावीच लागेल. या सर्वच लिखाणात प्रतिपाद्य विषयांचे अत्यंत तर्कशुद्धरितीने खंडण-मंडण केलेले आढळते. उदाहरणादाखल बोलावयाचे झाल्यास १ नोव्हेंबर १९५६ रोजी द्विभाषिक मुंबई राज्याच्या उद्घाटनाच्या निमित्ताने यशवंतराव चव्हाणांनी केलेल्या भाषणांतील मुद्दयांचे अतिशय परखड व सत्यान्वेषी खंडण राष्ट्रवीरकारांनी केलेले आहे असे दिसून येते. यावेळी यशवंतराव चव्हाणांनी सर्व मराठी व गुजराती बांधवांनी या द्विभाषी राज्याचे मन:पूर्वक स्वागत केले आहे तसेच राज्यातील सर्व जनतेच्या सदिच्छा माझ्या पाठीशी उभ्या आहेत असे गृहीत धरूनच मी नव्या राज्याच्या कारभाराला सुरूवात करीत आहे असे विधान केलेले दिसून येते. या त्यांच्या विधानास प्रत्युत्तरादाखल राष्ट्रवीरकारांनी श्री. चव्हाण यांची भाषा वस्तुस्थितीच्या अत्यंत विरूद्ध अशी आहे. महाराष्ट्र व गुजरातमधील वहुसंख्य जनता आजही संयुक्त महाराष्ट्र व महागुजरात भाषिक राज्यांची सत्याग्रहाची वळकट कास घालून मागणी करीत आहे व त्यांनी गृहीत धरलेल्या जनतेचा पाठींवा सर्वथैव निराधार आहे.

महाराष्ट्रातील वहुसंख्य जनतेच्या इच्छा व अस्मिता डावलून १ नोव्हेंबर १९५६ रोजी जे द्विभाषिक मुंबई राज्य स्थापन करण्यात आले तो दिवस सीमावासीय वेळगावकरांनी महाराष्ट्राच्या इतिहासातील काळा दिवस म्हणून पाळला. महाराष्ट्रात याकाळात दिवाळीचा सण साजरा केला जात होता परंतू सीमावर्तीय वेळगावकर मात्र दिवाळी सण साजरा न करता कडकडीत हरताळ पाळून कॉंग्रेस राज्यकर्त्यांचा निषेध करीत होते. वेळगावकरांनी यादिवशी सायंकाळी ५.00 वा.प्रचंड मुक मिरवणूक काढली. या मिरवणूकीत ३0-३२ हजार स्त्री-पुरूषांनी सहभाग घेतला व यावेळी रात्री ७.00 वा. प्रचंड निषेध सभा झाली तसेच हुतात्म्यांना आदरांजली वाहण्याकरिता पहाटे ५.00 वा. अबालवृद्धांनी प्रभात फेरी काढली व हुतात्मा चौकात श्री.मारूतीराव वेन्नाळकरांनी प्राणाहुती दिलेल्या या प्रभृतींच्या प्रतिमेवर समुदायाच्या वतीने श्री.बा.रं.सुंठणकर यांनी सामुदायिक अभिवादनाने आदराची पुष्पांजली वाहिली व सभेची सांगता झाली. ही प्रचंड प्रवुद्ध मिरवणूक वेळगावच्या इतिहासात सर्वतोपरी पहिली म्हणूनच नोंदविली जाईल. यावेळी या सभेला श्री.बा.रं.सुंठणकर, कॉ.कृष्णा मेणसे, वॅ.नाथ पै व र.के.खाडीलकर यांनी संबोधीत केले ६.

राष्ट्रवीरकार इ.स.१९६0 मध्ये संयुक्त महाराष्ट्र निर्माण होईपर्यंत सातत्याने सीमावर्ती वेळगावातून मराठी भाषिक प्रदेशाचा समावेश संयुक्त महाराष्ट्रात व्हावा याकरिता सातत्याने आग्रही राहिले व त्यादृष्टिने सातत्याने त्यांनी स्वातंत्र्योत्तर कालावधीतही नवख्या भारतीय राज्यकर्त्यांविषयी राष्ट्रवीरमधून लिखान करून त्यांनी संयुक्त महाराष्ट्र निर्माण होईपर्यंत संयुक्त महाराष्ट्र चळवळीत हिरिरीने सहभाग घेतला. शामराव देसाई या वहुआयामी वक्तृत्त्वामुळे आणि महाराष्ट्रीय जनतेच्या कार्यकर्तृत्त्वरूपी महत्त्प्रयासामुळेच १ मे १९६0 रोजी संयुक्त महाराष्ट्र राज्य अस्तित्त्वात आले व संयुक्त महाराष्ट्र चळवळीस यश प्राप्त झालेले दिसून येते.

**संदर्भ :**


१. सावळे दिपा, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, एज्युकेशन पब्लिशर, २0१३, पृ-३५४.
२. कित्ता, पृ-३५५.
३. पवार जयसिंगराव (संपा.), राष्ट्रवीरकार शामराव देसाई जीवन आणि कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २0१६, पृ-४२.
४. कित्ता, पृ-४३.
५. कित्ता, पृ-४३, ४४.
६. कित्ता, पृ-४४, ४५.


**इतर संदर्भ :**


१. राष्ट्रवीर अंकाचे निवडक लेख.